



दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २६९ •रविवार, दि.२८ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







# पुण्यात शरद पवारांनी शब्द फिरवला

## चर्चा केली पुतण्याशी, पण आघाडी काँग्रेसशी; अजितदादांचा मोठा गेम

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात नेमकं चाललंय काय? हा प्रश्न निर्माण होण्याचं कारण म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादीत हालचाली. कारण, सोबत येणार येणार म्हणत, दोन्ही राष्ट्रवादीत दुरावा निर्माण झाला. पण, आता हाच दुरावा पुण्यात महाविकास आघाडीच्या एकोप्याचं कारण ठरण्याची चिन्ह आहेत. पुणे महापालिकेच्या निवडणुकीत कोण कुणाबरोबर चाललंय? या संभ्रमात पुणेकर मतदार सध्या आहेत. मागील आठवडाभरात ज्या वेगानं घडामोडी घडल्या आणि आता जे चित्र समोर येतंय, ते पूर्णपणे बदलले आहे. कारण, पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. यासाठी दोन्ही राष्ट्रवादीकडून बरीच खलबतं झाली. जागावाटपासाठीच्या बैठकीत चांगलीच घासाघीस देखील झाली होती.

पुण्यात एकत्र निवडणूक लढण्याबाबत शुक्रवारी रात्रीतूनच निर्णय होईल असं बोललं जात असतानात अचानक शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे पदाधिकारी काँग्रेस नेत्यांसोबत चर्चेसाठी पोहोचले. राष्ट्रवादी शरद पवारांच्या पक्षाचे पदाधिकारी आणि काँग्रेस नेत्यांमध्ये बैठक झाली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून सन्मानजनक जागा मिळत नसल्यामुळे काकांच्या राष्ट्रवादीनं काँग्रेससोबत बोलणी सुरू केली. तर दुसरीकडे अजित पवारांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते आझम पानसरे यांच्या निवासस्थानी जाऊन चर्चा केली.

### • पुण्यात तिरंगी सामना होण्याची शक्यता

**एकंदरीतच, पुणे जिल्ह्यात भाजपविरोधात एकत्र येण्याच्या दोन्ही राष्ट्रवादीच्या हालचाली सुरू होत्या.. पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीत सकारात्मक चर्चा सुरू असल्याचं दिसतंय.पण, पुणे महापालिकेत मात्र काकांच्या पक्षाला कमी लेखण अजित पवारांच्या अंगलट आल्याचं दिसतंय. त्यामुळंच आता पुण्यात भाजप विरुद्ध अजित पवार विरुद्ध महाविकास आघाडी असा तिरंगी सामना होण्याची चिन्ह आहेत.**

### • पुण्यात नेमकं कोण कोणासोबत आघाडी करणार?

त्यामुळ पुण्यात नेमकं कोण कोणासोबत आघाडी करणार? या प्रश्नाचं गूढ शनिवारी दुपारपर्यंत कायम होतं. काका शरद पवारांच्या राष्ट्रवादीनं ज्या तऱ्हेनं अजित पवारांना चेकमेट करत, महाविकास आघाडीच्या मित्रांशी हातमिळवणी केली, ज्यावरुन अजित पवारांनाही पत्रकारांच्या प्रश्नांना काय उत्तर द्यावं, हे कळत नव्हतं. अजित पवारांची उद्विग्नतेतून जे संकेत मिळते होते, तेच घडलंय. पवारांचे जे नेते अजित पवारांसोबत चर्चा सुरू असल्याचं सांगत होते, त्याच ▶ उर्वरित पान २ वर

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा; साक्षळपिंपरी येथे सीसीआय खरेदी केंद्र सुरू होणार

- पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे डॉ. ज्योती मेटे यांनी केली होती मागणी
- केंद्र सुरु करण्याच्या निर्णयाबद्दल डॉ. ज्योती मेटे यांनी मान ले अजित दादाचे आभार

**बीड । प्रतिनिधी**



सध्या कापूस विक्रीचा हंगाम सुरू असताना शिरूर, आष्टी, पाटोदा व बीड तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठी सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) मार्फत खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी ५० ते ६० किलोमीटर अंतरावर जावे लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक तसेच वेळेची मोठी गैरसोय सहन करावी लागत होती. ही गंभीर बाब शिवसंग्रामचे अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी निवेदनाद्वारे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. या निवेदनाची तत्काळ दखल घेत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी त्वरित कार्यवाहीचे आदेश दिले. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची होत असलेली ▶ उर्वरित पान २ वर

# पद्मश्री, पद्मभूषण, भारतरत्न हे नागरी पुरस्कार नावापूर्वी वापरण्यावर मुंबई उच्च न्यायालयाची बंदी

**मुंबई । प्रतिनिधी**



पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि भारतरत्न हे नागरी पुरस्कार पदव्या नाहीत. त्यामुळे विजेत्यांच्या नावापुढे त्यांचा वापर करणे अयोग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूती सोमशेखर सुंदरसेन यांच्या एकलपीठाने निर्वाळा दिला आहे. त्यामुळे ते एखाद्या व्यक्तीच्या नावापूर्वी किंवा नंतर वापरता येत नाहीत. न्यायालयाने एका याचिकेच्या केस शीर्षकात पद्मश्री शब्दाच्या वापराबद्दल हे निरीक्षण नोंदवले.मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. सोमशेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठासमोर यासंदर्भातील याचिकेची सुनावणी सुरू होती.२००४ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेले डॉ. शरद मोरेश्वर हर्डीकर हे देखील एक पक्ष होते. त्यांचे नाव केस शीर्षकात पद्मश्री डॉ. शरद मोरेश्वर हर्डीकर असे ▶ उर्वरित पान २ वर

# वन जमिनीवर शेती करता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल



**नवी दिल्ली**

वन जमीन शेतीसाठी वापरण्यास कायद्याने प्रतिबंध घालण्यात आल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे वन जमीन वापराबद्दल कायद्याचे उल्लंघन करू नये, असा संदेश सर्वोच्च न्यायालयाने निकालातून दिला आहे.

कर्नाटकमधील गांधी जीवन सामुहिक शेती सहकारी संस्थेला कर्नाटक सरकारने १३४ एकर राखीव जंगलाची जमीन शेतीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. हा भाडेपट्टा बेकायदेशीर असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्याची मुदतवाढ मागण्यात आली. परंतु याबाबतची याचिका फेटाळत वनजमिनींवर कोणाचीही खाजगी मालकी सांगता येणार नसल्याचे न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. या प्रकरणाचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांतून वन आरक्षण रद्द करण्यास ▶ उर्वरित पान २ वर

# माजलगावच्या एसडीओंनी मुरुमाचा टॅक्टर पकडला

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी- तेलगांव रोडवरील लोणवळ फाट्यानजीक भरलेले मुरुमाचे टिपर वाहतुक करताना दिसुन येताच माजलगाव उपविभागीय कार्यालयाचे उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांनी पकडले. ही कारवाई परवा दि. २५ डिसेंबर रोजी करण्यात आली आहे. सदरील टिप्पर आज देखील वडवणी तहसीलच्या प्रांगणात उभा केलेले आहे. अद्याप पयरत कारवाई झालेली नाही असे दिसून येत आहे. वडवणी-तेलगांव रोडवरील मुरूमाने भरलेले टिप्पर एम एच ४५ एएक्स २१७० वाहतूक करताना माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांना दिसताच त्यांनी या टिप्परमध्ये काय आहे ? ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये मुलाला कुणबी प्रमाणपत्र मिळत नसल्याने शेतकऱ्याने उचललं टोकाचं पाऊल

**बीड । प्रतिनिधी**



बीडमध्ये बाबुराव विठ्ठल यमपूरे(५५) या शेतकऱ्याने जीवन संपवल्याची घटना घडली आहे. त्यांच्या मुलाला कुणबी प्रमाणपत्र मिळत नसल्याने तणावातुन टोकाचं पाऊल उचलल्याचा दावा त्यांच्या काही नातेवाईकांनी केला आहे. तथापि, या प्रकरणी कोणतीही औपचारिक तक्रार दाखल झालेली नाही. पोलिसांच्या माहितीनुसार, यमपूरे यांनी सकाळी बीड तालुक्यातील माजरसुंबा गावाजवळील यमपूरे वस्तीत एका झाडाला गळफास घेतला. यमपूरे यांच्या अनेक नातेवाईकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले होते, परंतु त्यांच्या मुलाचा अर्ज तहसील कार्यालयात प्रलंबित होता. प्रमाणपत्राअभावी मुलाच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्यावर विशेषतः आरक्षणाच्या लाभांवर, प्रतिकूल परिणाम होत असल्याने यमपूरे खूप तणावात होते. मृतदेहाचे शवविच्छेदन करून तो नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे. घटनास्थळी कोणतीही ▶ उर्वरित पान २ वर

# मटणासाठी लाईनमध्ये थांब म्हटल्यावर राग; 'मी मोठा अधिकारी, नाव गुगलवर शोध' म्हणत मटण दुकानदाराचे अपहरण अन् मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**



मटण घ्यायला आलेल्या व्यक्तीला लाईनमध्ये थांब म्हटल्याचा राग आला आणि त्याने थेट मटण दुकानदाराचे अपहरण करून त्याला मारहाण केल्याची धक्कादायक घटना बारामतीमध्ये घडली. 'लाईनमध्ये थांबायला वेळ नाही, मी मोठा अधिकारी आहे' अशी मग्रुरी दाखवणाऱ्या इसमाने सहकाऱ्यांच्या मदतीने थेट मटण दुकानदाराचे अपहरण केलं आणि त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं. या प्रकरणी एकाला बारामती पोलिसांनी अटक केली आहे. बारामतीतील ज्ञानेश्वर भारत आटोळे हा तरुण सूर्यनगरी येथे 'जय भवानी मटन शॉप' चालवून कुटुंबाचा ▶ उर्वरित पान २ वर

# अरेरे... नियतीचा क्रूर खेळ! उस तोडणीचं काम आटोपून लेकरांना भेटायला घरी निघालेल्या बापाचा रस्त्यावरच शेवट

**बीड । प्रतिनिधी**



पोटाची खळगी भरण्यासाठी दिवसभर राबणाऱ्या एका कष्टकरी ऊसतोड मजुराचा रस्ते अपघातात दुर्दैवी अंत झाल्याची घटना गेवराई-माजलगाव महामार्गावरील राजुरी मळा परिसरात घडली आहे. सुसाट वेगाने येणाऱ्या दुचाकीने दिलेल्या जोरदार धडकेत मजुराचा जागीच मृत्यू झाला असून, या अपघातात दुचाकीस्वारही गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत एकनाथ पवार (वय ४० वर्षे, रा. राजुरी मळा) हे ऊसतोड मजूर म्हणून काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. शुक्रवारी, २६ डिसेंबर रोजी दिवसभर ऊस तोडणीचे काम आटोपल्यानंतर ते संध्याकाळच्या सुमारास पायी आपल्या घराकडे निघाले होते. ▶ उर्वरित पान २

# छत्रपती संभाजीराजे क्रीडांगणाची दुरावस्था

- सुरक्षा रामभरोसे, स्वच्छता गायब, खेळासाठीचे मैदान की कचराकुंडी?
- नगरपालिकेची बेपर्वाई लोकांच्या जिव्हारी; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले छत्रपती संभाजीराजे क्रीडांगण गेल्या अनेक महिन्यांपासून देखभालीअभावी दुर्लक्षित अवस्थेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील विद्यार्थी, महिला व नागरिक सकाळी व संध्याकाळी फिरण्यासाठी या क्रीडांगणाचा वापर करतात; मात्र सध्या अस्वच्छता, दुगरधी व सुरक्षिततेअभावी नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. क्रीडांगणाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नसल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच क्रीडांगणाच्या मध्यभागी दुचाकी व चारचाकी वाहने उभी केली जात असल्याने फिरणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. व्यायामासाठी उपलब्ध असलेले साहित्य मोडकळीस आले असून, यापूर्वी बसवण्यात आलेल्या साहित्याचीही सध्या दुरवस्था झाल्याचे दिसून येते.क्रीडांगणातील अनेक विद्युत पथदिवे बंद असल्यामुळे संध्याकाळनंतर परिसरात अंधार पसरतो.

▶ उर्वरित पान २ वर

**• बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजीराजे क्रीडांगणाची अवस्था गंभीर बनली असून, देखभाल व सुरक्षेअभावी नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असून जिल्हाधिकारी यांनी तत्काळ पाहणी करून यात दोषींवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.**

**• बीड शहरातील छत्रपती संभाजीराजे क्रीडांगण सध्या देखभालीअभावी दयनीय अवस्थेत असून, अस्वच्छता, अपुरी प्रकाशव्यवस्था, बंद स्वच्छतागृह व सुरक्षा अभावामुळे नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.मुख्य अधिकारी, नगर परिषद बीड यांनी वैर्यो कि लक्ष घालून तातडीने उपाययोजना केल्यास नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ व आरोग्यदायी क्रीडांगण उपलब्ध होईल, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्ये केली जात आहे.**

**• नागरिकांची ठळक मागणी-**

**• जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: स्थळ पाहणी करावी**

**• नगरपालिकेकडून तत्काळ अहवाल मागवावा**

**• क्रीडांगण स्वच्छता व देखभालीबाबत ठोस आदेश द्यावेत**

**• बंद पथदिवे, स्वच्छतागृह व सुरक्षा व्यवस्थेबाबत त्वरित कार्यवाही**

**• दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी**






# नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’चे समाजशास्त्रीय महत्त्व

मानवी समाजरचनेचा केंद्रबिंदू म्हणजे नातेसंबंध होय. माणूस जन्माला येतो तो केवळ जैविक अस्तित्व म्हणून नव्हे, तर सामाजिक अस्तित्व म्हणून. कुटुंब, नातेवाईक, समाज, संस्था आणि विविध सामाजिक गट यांच्याशी असलेल्या परस्परसंबंधांतूनच त्याची ओळख, मूल्यव्यवस्था आणि जीवनदृष्टी घडत असते. या सर्व नात्यांमध्ये मैत्रीचे स्थान अत्यंत वेगळे आणि अर्थपूर्ण आहे. मैत्री ही कोणत्याही औपचारिक बंधनांवर आधारलेली नसून स्वेच्छेने, समतेच्या आणि विश्वासाच्या पायावर उभी राहिलेली नाती असतात. २८ डिसेंबर रोजी साजरा होणारा ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या मैत्रीच्या नात्यांचे स्मरण करून देतो आणि आधुनिक समाजातील संवादाच्या तुटवड्यावर समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करण्याची संधी देतो. समाजशास्त्र माणसाला ‘सामाजिक प्राणी’ मानते. व्यक्तीचे विचार, भावना, वर्तन आणि जीवनशैली ही समाजातील सततच्या संवादातूनच घडत असते. या प्रक्रियेत मित्रांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरते. मित्र हा असा सामाजिक आधार असतो की ज्याच्यासमोर व्यक्ती कोणताही मुखवटा न घालता स्वतःला व्यक्त करू शकते. कुटुंबातील किंवा औपचारिक सामाजिक चौकटीतील मर्यादांपलीकडे जाऊन मित्राशी संवाद साधता येतो. त्यामुळे मैत्री ही व्यक्तीच्या भावनिक सुरक्षिततेसाठी आणि मानसिक आरोग्यासाठी एक महत्त्वाची सामाजिक संस्था ठरते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या संस्थेचे महत्त्व समाजाला पुन्हा जाणवून देतो.

आधुनिक काळात मानवी जीवन अधिक गतिमान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण झाले आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे माणूस अधिकाधिक व्यस्त आणि एकाकी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने संवादाची साधने प्रचंड वाढवली असली, तरी संवादाची खोली कमी होत असल्याचे समाजशास्त्रीय अभ्यासातून दिसून येते. सोशल मीडिया, व्हॉट्सप संदेश किंवा इमोजी यांच्या माध्यमातून संपर्क राहतो; पण मन मोकळे करून बोलण्याची सवय कमी होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मित्राला फोन करून प्रत्यक्ष संवाद साधणे ही कृती केवळ तांत्रिक नसून सामाजिक आणि भावनिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ठरते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या डिजिटल दुराव्याला छेद देणारा मानवी संदेश देतो. समाजशास्त्रातील ‘सामाजिक भांडवल’ ही संकल्पना नातेसंबंधांचे सामर्थ्य स्पष्ट करते. विश्वास, परस्पर सहकार्य, संवाद आणि सामाजिक नेटवर्क्स यांचा एकत्रित परिणाम म्हणजे सामाजिक भांडवल. मित्रपरिवार हा या सामाजिक भांडवलाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. अडचणीच्या काळात मित्र मदतीला येतात, भावनिक आधार देतात आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करतात. अनेक वेळा मित्राशी केलेला संवाद हा उपचारासारखा ठरतो. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या सामाजिक भांडवलाचे जतन आणि संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित करतो. मानसिक आरोग्याच्या संदर्भात या दिवसाचे महत्त्व अधिक ठळकपणे जाणवते. आजच्या समाजात तणाव, नैराश्य, चिंता, असुरक्षितता आणि एकटेपणा या समस्या झपाट्याने वाढत आहेत. समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय अभ्यासानुसार सामाजिक अलगाव हा मानसिक आजारांचा एक प्रमुख कारणीभूत घटक आहे. विशेषतः विद्यार्थी, स्थलांतरित कामगार, शहरी नोकरदार वर्ग आणि वृद्ध यांना या समस्यांचा अधिक सामना करावा लागतो. अशा वेळी मित्राचा साधा फोन कॉलही एखाद्या व्यक्तीसाठी आधारवड ठरू शकतो. ‘कोणी तरी आपल्याशी संवाद साधते आहे’ ही भावना माणसाला मानसिक बळ देते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस समाजाला या संवेदनशील वास्तवाची जाणीव करून देतो.

भारतीय समाजात मैत्रीची संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ग्रामीण समाजात शेजारी, सहकारी, बालसवंगडी यांच्यातून मैत्री विकसित होत असे. सामूहिक जीवनपद्धतीमुळे संवाद, सहवास आणि परस्परावलंबन अधिक होते. मात्र आधुनिक काळात विभक्त कुटुंब पद्धती, स्थलांतर, शिक्षण आणि नोकरीच्या संधींमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. अनेकदा बालपणीचे किंवा तरुणपणीचे मित्र काळाच्या ओघात संपर्काबाहेर जातात. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या विस्मरणात गेलेल्या नात्यांना पुन्हा उजाळा देण्याची संधी देतो.

पिढ्यान्पिढ्यांतील नातेसंबंधांच्या संदर्भातही या दिवसाचे महत्त्व आहे. जुने मित्र म्हणजे केवळ व्यक्ती नव्हे, तर आपल्या जीवनातील आठवणी, अनुभव आणि सामाजिक इतिहास असतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशी नाती जपणे म्हणजे सामाजिक स्मृती जपणे होय. मित्राला केलेला फोन हा भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा सेतू ठरतो. त्यामुळे ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस सामाजिक सलगतेचे प्रतीक ठरतो. स्त्री-पुरुष मैत्री, आंतरजातीय, आंतरधर्मीय आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीतील मैत्री समाजातील समता, सहिष्णुता आणि सलोखा वाढवण्यास मदत करतात. समाजशास्त्र मानते की वैयक्तिक पातळीवरील संवाद आणि मैत्रीमुळे सामाजिक भिंती, पूर्वग्रह आणि भेदभाव कमी होऊ शकतात. एका साध्या संवादातून परस्पर समज वाढते आणि सामाजिक ऐक्य मजबूत होते. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या व्यापक सामाजिक ऐक्याचा विचार करण्यास प्रवृत्त करतो. कामाच्या ठिकाणी असलेली मैत्रीही समाजशास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. सहकाऱ्यांमधील मैत्रीमुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते, तणाव कमी होतो आणि परस्पर सहकार्य वाढते. अनेक संशोधनांतून असे स्पष्ट झाले आहे की ज्या संस्थांमध्ये मानवी संबंध सुदृढ असतात, त्या संस्था अधिक स्थिर आणि कार्यक्षम ठरतात. त्यामुळे हा दिवस वैयक्तिक आयुष्यापुरता मर्यादित न राहता सामाजिक आणि व्यावसायिक जीवनातील संवादाचे महत्त्व अधोरेखित करतो. वृद्धांच्या आयुष्यात संवाद आणि मैत्रीचे स्थान अधिक संवेदनशील आहे. विभक्त कुटुंब पद्धती, शहरी जीवनशैली आणि स्थलांतरामुळे अनेक वृद्ध एकटे पडलेले दिसतात. त्यांच्या आयुष्यात मित्राचा फोन कॉल हा आनंद, आठवणी आणि आपुलकीचा स्रोत ठरतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, वृद्धांचे सामाजिक एकाकीपण कमी करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ‘नॅशनल कॉल अ फ्रेंड डे’ हा दिवस या जबाबदारीची जाणीव करून देतो. – डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## पुण्यात शरद...

अंकुश काकडेंनी शनिवारी दोन्ही राष्ट्रवादींची आघाडी होणार नसल्याचं स्पष्ट करत, पुण्यात मविआ एकत्र लढणार असल्याचं जाहीर करून टाकलं.

### राष्ट्रवादीचं पुण्यात बिनसलं पण पिंपरीत जुळलं

सायंकाळपर्यंत पुण्यातील मविआचे जागावाटपही ठरल्याची माहिती मिळत होती. त्यामुळं पुण्यात पवार काका-पुतणे विरोधात लढण्याबाबत स्पष्ट संकेत मिळाले. तिकडे पिंपरी-चिंचवडमध्ये मात्र दोन्ही राष्ट्रवादी एकत्रपणे भाजपला आव्हान देण्याची दाट शक्यता आहे. कारण, पिंपरी- चिंचवडसंदर्भात अजित पवार आणि शरद पवारांचे खासदार अमोल कोल्हे यांच्यात बैठक झाली. अजित पवारांच्या जिजाई निवासस्थानी जवळपास अर्धा तास दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. दोन दिवसांपूर्वी अमोल कोल्हे आणि रोहित पवार यांनीही जिजाई निवासस्थानी अजित पवारांची भेट घेतलेली. त्यानंतर शुक्रवारी रात्री उशिरा अजित पवार पिंपरीचिंचवडमध्ये जाऊन तिथल्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली. आणि पुन्हा एकदा शनिवारी अमोल कोल्हेंसोबत बैठक केली. त्यामुळं पुण्यात बिनसलं असलं, तरी पिंपरी-चिंचवडमध्ये पवार काका-पुतणे एकत्र येणार, हे जवळपास निश्चित मानलं जातंय.

## कापूस उत्पादक...

गैरसोय टळणार असून, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या संवेदनशील व जलद निर्णयाबद्दल डॉ. ज्योती मेटे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. दरम्यान, सीसीआयमार्फत कापूस खरेदी येत्या सोमवारपासून साक्षळपिंपरी येथील श्री. नगद नारायण सूतगिरणी येथे सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आता जवळच कापूस विक्रीची सुविधा उपलब्ध होणार आहे.

## पद्मश्री, पद्मभूषण...

सूचीबद्ध केले होते. न्यायाधीशांनी यावर आक्षेप घेत म्हटले की, हे कायद्यानुसार बेकायदेशीर आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाने १९९५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाचा हवाला दिला.त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले होते की, पद्म पुरस्कार आणि भारतरत्न ही उपाधी नाही. तसेच ते नावापूर्वी किंवा नंतर वापरले जाऊ नये. न्या. सुंदरेसन यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय संविधानाच्या कलम १४१ अंतर्गत सर्वांना लागू आहे आणि त्याचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. पुढील कायदेशीर कार्यवाहीमध्ये सर्व पक्ष आणि न्यायालये या नियमाचे पालन करतील, असे निर्देश त्यांनी दिले.दरम्यान, देशात पद्म पुरस्कारांची सुरुवात १९५४ मध्ये झाली. हे चार पुरस्कार म्हणजे भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री. हे पुरस्कार २६ जानेवारी रोजी जाहीर केले जातात. मार्च-एप्रिलमध्ये राष्ट्रपती भवनात हा समारंभ आयोजित केला जातो. या पुरस्कारात पदक आणि प्रशस्तिपत्र असते. भारतरत्न हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे, जो राष्ट्रीय सेवा, क्रीडा, विज्ञान, साहित्य आणि कला यासाठी दिला जातो. दरवर्षी फक्त तीन लोकांनाच हा पुरस्कार दिला जाऊ शकतो. आतापर्यंत एकूण ४८ जणांना भारतरत्न मिळाला आहे. पहिल्यांदा १९५४ मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना भारतरत्न देण्यात आला.

## वन जमिनीवर...

प्रतिबंध करणारे बंधनकारक निर्देश दिले आहेत. वनजमिनीवर शेती करण्यासाठी जंगल साफ करणे अपरिहार्य ठरते. परंतु अशी कार्यवाही ही वन (संवर्धन) कायदा, १९८० च्या कलम २ अंतर्गत येते. या कायद्यानुसार केंद्र सरकारची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय कोणतीही वनजमीन बिगर- वनीकरणासाठी वापरता येत नाही. खाजगी हक्काला प्रतिबंध- खाजगी व्यक्ती वा संस्था वा पक्षाला बेकायदेशीररीत्या देण्यात आलेली राखीव वन परत मिळवावीत. वनावर कोणाचाही खासगी हक्क असू शकत नाही, असे न्यायालयाने या निकालात राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश दिले आहेत. तसेच याचिका फेटाळत भाडेपट्ट्याची मुदतवाढ देण्यास स्पष्ट नकार सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. झाडे लावण्याचे सर्वोच्च निर्देश- या प्रकरणाचा निकाल लिहिताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, संबंधित वन क्षेत्रात स्थानिक प्रजातींची झाडे लावून पुन्हा वनीकरण करावे. तसेच सहकारी संस्थेने १० वर्षांहून अधिक काळ या वनजमिनीवर शेती करून ताबा ठेवला असला तरी त्यामुळे त्यांना बेकायदेशीररीत्या दिलेल्या भाडेपट्ट्याची मुदतवाढ मिळण्याचा कोणताही अधिकार निर्माण होत नाही. असेही नमूद केले. शेतीसाठी परवानगी नाही- सध्याच्या कायद्यांनुसार वनजमिनींचा वापर बिगर-वनीकरणासाठी करता येत नाही आणि त्यात शेतीचाही समावेश होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या परवानग्या देणे कायद्याच्या विरोधात असल्याचे न्यायालयाने निकालात स्पष्ट केले. तर कर्नाटक सरकारनेही सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्टपणे मान्य केले होते की, सदर जमीन ‘वन’ श्रेणीत येते. तसेच सदर जमीन राज्य वन विभागाच्या मालकीची व ताब्यातील आहे.दरम्यान,सर्वोच्च न्यायालयाने यावेळी २००० साली दिलेल्या एका जुन्या निकालाची आठवण करून दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही जंगलाचे, अभयारण्याचे किंवा राष्ट्रीय उद्यानाचे आरक्षण रद्द करता येणार नाही, असे जुन्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## माजलगावच्या एसडीओंनी...

याची पाहणी करत असताना टिप्पर मध्ये मुरूम भरलेला दिसून आला असल्याने सदरील टिप्पर हे वडवणी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आणून उभा केले. ही कारवाई परवा दि. २५ डिसेंबर रोजी करण्यात आली आहे. असे सांगण्यात आले आहे. आज देखील सदरील टिप्पर हे तहसीलच्या प्रांगणात उभा केलेले दिसून येत असून अद्याप टिप्परवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. तहसीलच्या प्रशासनाने अजून कुठल्याही पद्धतीची विचारपूस अथवा चौकशी केली नाही. किंवा टिप्पर मालक यांनी कोणतेही पुरावे प्रशासनाकडे दिलेले नाहीत.अशी देखील माहिती मिळाली आहे. तर सध्या वडवणी शहरातून जाणाऱ्या महामार्ग तसेच मुख्य रस्त्याचे काम देखील सुरू असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गौखणिज करणारे टिप्पर वाहतूक करताना आढळून येत आहेत. हे टिप्पर शासकीय कामाच्या आहे की माफियांचे हे समजायला मार्ग नसून या कार्यवाही बाबत माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांनी मोबाईल उचलला नसल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकलेली नाही.

## बीडमध्ये मुलाला....

सुसाइड नोट सापडली नाही. मृत्यूच्या संदर्भात नातेवाईकांकडून आम्हाला कोणतीही औपचारिक तक्रार देण्यात आलेली नाही. सर्व बाजूंनी तपास केला जात आहे, असे नेमकनूर पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी सांगितले.

## मटणासाठी लाईनमध्ये....

उदरनिर्वाह करतो. २१ डिसेंबरला मटन खरेदी करण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीने लाईनमध्ये उभे राहण्यास नकार दिला. ’गुगलवर माझं नाव शोध, मी मोठा अधिकारी आहे’ अशी दमदाटी त्याने केली. त्यावेळी वाद-विवाद झाला आणि वजनाचा काटा उचलून मारण्याचा प्रयत्न झाल्यानंतर तो व्यक्ती मटन घेऊन निघून गेला. मटण दुकानदाराचे अपहरण- या घटनेचा राग मनात धरून त्या व्यक्तीने बदला घेण्यासाठी ऋषी गावडे याला सुपारी दिली. त्यानंतर ऋषी गावडे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी ज्ञानेश्वर आटोळे याला २५ डिसेंबर रोजी गाठले. पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट आणि क्रेटा गाड्यांमधून आलेल्या पाच इसमांनी ज्ञानेश्वर आटोळे याला जबरदस्तीने स्विफ्ट कारमध्ये बसवले. ज्ञानेश्वर आटोळे याच्याशी मटणाच्या दुकानावर वाद घालणारा व्यक्ती हा व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून ऋषी गावडेच्या संपर्कात होता. ’मी सांगितले तसेच करा, मला बघू द्या याच्यात किती दम आहे’ असे म्हणत त्याने मारहाणीचे आदेश दिल्याचा आरोप आहे. कन्हेरी रोड आणि जळोची ब्रिज परिसरात नेऊन आरोपींनी कोयत्याचे मुठीने, बेल्टने आणि लाथा-बुक्क्यांनी मटण दुकानदाराला मारहाण केली. ’तुला जिवंत सोडणार नाही’ अशी धमकीही त्यांनी दिली. यानंतर ऋषी गावडे यानेही शिवीगाळ आणि दमदाटी केल्याचा आरोप नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणी अपहरण करून मारहाण करणे आणि इतर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी ऋषी गावडे यास पोलिसांनी अटक केली असून प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. संकेत मुसळे, शितल बेंगारे (रा. पारवडी) हे सुद्धा गुन्ह्यात सहभागी असल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं. इतर आरोपींबाबत तपास सुरू आहे.

## अरेरे... नियतीचा....

रात्री ८ वाजेच्या सुमारास ते राजुरी मळा परिसरातील महामार्गावरून चालत असताना, गेवराईकडून माजलगावच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव दुचाकीने त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, एकनाथ पवार यांचा जागीच मृत्यू झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पवारांना पाहून परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेतली, मात्र तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती. एक ठार तर दुचाकीस्वार गंभीर- या अपघातात एक जण ठार झाला मात्र दुचाकी चालक तुषार चंद्रकांत जगताप (वय २५ वर्षे, रा. शेलू मारफळा) हे देखील गंभीर जखमी झाले आहेत. धडकेनंतर दुचाकीचा ताबा सुटल्याने ते रस्त्यावर फेकला गेले, ज्यामुळे त्याच्या डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले असून, प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीराजे...

यामुळे अनुचित घटना घडण्याची शक्यता व्ये केली जात आहे. क्रीडांगणातील स्वच्छतागृह अनेक महिन्यांपासून बंद अवस्थेत असून, त्यामुळे महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होत आहे. परिणामी परिसरात अस्वच्छता व दुगरधी पसरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. येथील महापुरुषांच्या अर्धाकृती पुतळ्यांच्या परिसरातही प्रकाशव्यवस्था बंद असल्याबद्दल नागरिकांमध्ये नाराजी व्ये होत आहे. क्रीडांगण हे खेळ व आरोग्यासाठी असताना, ते राजकीय कार्यक्रमांसाठी भाडेतत्त्वावर दिले जात असल्याचा आरोपही काही नागरिकांकडून करण्यात येत आहे.देखभालीअभावी मैदानावर धूळ साचून चालताना मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून, त्यामुळे श्वसनविकारांचा धोका निर्माण होऊ शकतो. याठिकाणी गुरे-ढोरे मु पणे फिरत असल्याचेही आढळून येते.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड शहरात ...

नवनीत कांवत यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत.ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर ,उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतल कुमार बल्लाळ,पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पो हेकॉ संदीप आघाव, मनोज जायभाय, गहिनीनाथ बावनकर, इलियास शेख, राम पवार व मंगेश शिंदे यांनी पार पाडली.

## 'जय भवानी'ला...

शिक्कामोर्तब केला आहे. राज्यातील साखर कारखानदारीतील तांत्रिक कार्यक्षमतेचे मुल्यमापन करून वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटकडून हे मानाचे पुरस्कार दिले जातात. जय भवानीने अलिकडच्या काळात तांत्रिकदृष्ट्या स्वतःला सिध्द केले आहे. गेल्या हंगामात कारखान्याची कामगिरी सरस ठरली आहे, जयभवानीला मागील हंगामात शुन्य टक्के ब्रेकडाऊन, तांत्रिक कारणांसाठी कारखाना बंद राहण्याचे प्रमाण ०.५५% राखण्यात यश आले असून ते अत्यंत उल्लेखनीय आहे. मागील वर्षीच्या तुलनेत गाळप क्षमतेच्या वापरामध्ये ५.७८% ची वाढ झाली असून कारखान्याने १०.४१% साखर उतारा मिळविला आहे. साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा वापर केवळ २९.८१% इतका मर्यादित ठेवण्यात कारखान्याला यश आले असल्याची माहिती चेअरमन अमरसिंह पंडित यांनी दिली आहे. चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली जय भवानी कारखान्याने गाळप क्षमता वाढीसह स्वतःला तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे देश पातळीवर जय भवानीच्या कामाची दखल घेण्यात आली. सन २०२४-२५ च्या गळीत हंगामात मिलमधील ऊसाचा तंतुमय निर्देशांक ८४.०९% तर रिड्युस्ड मिल एक्स्ट्रॅक्शन ९५.२६% राखले गेले. प्रायमरी एक्स्ट्रॅक्शन ७३.८५% तर बगॅसची बचत १२.३०% झाली आहे. जय भवानीच्या तांत्रिक कौशल्याची दखल सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी घेतली. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे या मातृ संस्थेने केलेल्या मुल्यमापनात जय भवानीची कामगिरी सरस ठरल्यामुळे या कारखान्याला सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमते बाबतचा तृतीय पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. मानचिन्ह, प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप असून सोमवार, दि.२९ डिसेंबर रोजी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या पुरस्काराचे वितरण करून जय भवानीचे कौतुक करण्यात येणार आहे. जय भवानीच्या यशाबद्दल संस्थापक चेअरमन शिवाजीराव (दादा) पंडित, विद्यमान चेअरमन अमरसिंह पंडित, माजी चेअरमन जयसिंग पंडित, व्हा.चेअरमन भाऊसाहेब नाटकर, आ. विजयसिंह पंडित, जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, संचालक मंडळ, खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, ऊसतोडणी मजुर, वाहतुक कंत्राटदार व हितचिंतकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## महावितरण कडुन...

स्थानिक पातळीवर काम करणारे कर्मचारी योग्य पध्दतीने काम करून विज ग्राहकांना चांगली सेवा देत आसतांना रेडिंग वाले कर्मचारी अंदाजे रेडिंग टाकत जास्तीचे बीले आकारत असुन तलवाडा गावात कुठल्या भागातील ट्रांसफर जळाले तर चार चार महिने त्या ठिकाणी नविन ट्रान्सफर येत नाही आसे आसतांना देखील त्या त्या भागातील मिटरचे बील हजारो रुपयात येत आसल्याच्या प्रकाराने सर्व सामान्य विज ग्राहक मेटाकुटीला आले आसतांना वरिष्ठ अधिका-यांना या बाबत कल्पना दिल्या आसता ते महावितरणचीच बाजु पटऊन देत बील भरावेच लागेल आसे धमकी वजा बोलत आसल्याच्या प्रतिक्रिया तलवाडा परिसरात ऐकावयास मिळत असुन रेगुलर बील भरणा करणा-या विज ग्राहकांचे जास्तीचे बीले देऊन ती न भरल्यामुळे आणेकांचे मिटर टिडी पीडीच्या नावाखाली कनेक्शन कट करुन काढुन घेऊन जाऊन देखील घरगुती विज ग्राहकांना बीले मात्र चालूच असुन ज्या लोकांना ईमानदारीने नियमित बील भरण्याची सवय आहे ते आकडे टाकून विज घेण्याचे धाडस करु शकत नसल्याने आणेकांनी विजे अभावी घरजागा विकुन गाव सोडल्याचे भयावह चित्र तलवाडा गाव परिसरात पहावयास मिळत असुन तरी सुद्धा त्या त्या कुटुंबातील ईतर सदस्यांना नवनविन येणा-या वसुली अधिका-या कडुन मानसिक त्रास दिल्या जात आसल्याचे प्रकार तलवाडा परिसरात मोठ्या प्रमाणात समोर येत असुन तलवाडा येथे कार्यरत आसनारे कर्मचा-यांच्या सागन्यानुसार ते म्हणतात की आम्ही टिडी केलेले मिटर आमच्या कडुन पीडी झाले आहेत. परंतु ते वरिष्ठ पातळीवरुन पीडी का होत नाहीत कुणास ठाऊक आसे उत्तर ऐकावयास मिळत आसल्याने महावितरणच्या या आडील व तटील धोरणामुळे होत आसलेल्या मानसिक त्रासामुळे शेतकरी आत्महत्या प्रमाणे मिटर काढुन घेऊन घेलेल्या आणेक ग्राहकांना परत परत विज बील येत आसल्याने आत्महत्या करण्यासदृश्य विचार येऊ लागल्याचे आणेकांनी बोलुन दाखवले असुन आणेक कुटुंबिय घरजागा विकुन शहरीभागात स्थलांतरित झाल्याचे बोलल्या जात आहे.

## नाथ फाउंडेशन...

पॅड च्या उपयोगाने दररोज एक इंग्रजी शब्द व गणिते सोडवण्याचा संकल्प यावेळी केला असल्याचं संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हटले. जिल्हा परिषदेच्या शाळा इंग्रजी माध्यमापेक्षा चांगल्या बनवू असे देखील त्यांनी यावेळी म्हटले. यावेळी प्रभाकर जिजा घोरड, सुंदर कोकाटे, शिक्षक विकास घोरड सर, विलास घोरड, उल्हास घोरड, विशाल घोरड, लखन घोरड, निलेश घोरड, दादासाहेब घोरड, गणेश घोरड, दीपक घोरड, सुनील ठाकूर, जगदीश घोरड, अभिषेक घोरड, गणेश कोकाटे या ब्रम्हगाव येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती. या उपक्रमासाठी नाथ फाउंडेशन कोषाध्यक्ष धनंजय गुंदेकर, सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर, इंजि बंकट डावकर इत्यांदीसह शालेय विद्यार्थी शिक्षक वृंद श्रीमती शिंदे व श्रीमती सुरेखा सानप उपस्थित होत्या.

## पदे १५...

सरासरी काढल्यास एका पदासाठी १०८ उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत. मुंबईसह राज्यातील रिक्त पदे भरण्यासाठी सरकारने भरतीची घोषणा केल्यानंतर पोलिस प्रशासनाच्या वतीने प्रत्यक्षात प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शिपाई, चालक, बँड्समन, कारागृह शिपाई, एसआरपीएफ अशा वेगवेगळ्या पदांसाठी ही भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, १५,४०५ जागा भरण्यात येणार आहेत. या प्रक्रियेचा पहिला टप्पा ३० नोव्हेंबर रोजी संपला. मात्र, राज्याच्या कानाकोपऱ्यातून होणाऱ्या मागणीनुसार ही मुदत आठ दिवसांनी वाढविण्यात आली. ही मुदत संपल्यानंतर १५,४०५ पदांसाठी तब्बल १६ लाख ५२ हजार ८५० उमेदवारांनी अर्ज केल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. अर्ज करणाऱ्यांमध्ये ग्रामीण भागातील उच्चशिक्षितांची संख्या अधिक असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले. भरती प्रक्रियेचा पुढील टप्पा मैदानी चाचणी असून २० जानेवारीपासून ही प्रक्रिया सुरू होईल, असे हा अधिकारी म्हणाला. सर्वांत कमी म्हणजेच केवळ १९ पदे ही बँड्समनची भरण्यात येणार आहेत. मात्र, बँड्समनच्या एका पदासाठी सरासरी ८९५ उमेदवार स्पर्धेत आहेत.

## जलतरण स्पर्धेतही...

यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ जलतरण स्पर्धेने झाला. गेवराई येथील नगर परिषदेच्या जलतरण तलाव येथे शनिवार दिनांक २७ डिसेंबर रोजी जलतरण स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, गेवराई वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अमित मुळे, डॉक्टर्स असोसिएशन गेवराईचे अध्यक्ष डॉ. अशोक काळे, ॲड, प्रदीप मडके, सामाजिक कार्यकर्ते महादेव बेंद्रे, संजय भालशंकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे शारिरीक व मानसिक आरोग्य सुधारेल: डॉ. अशोक काळे यावेळी बोलताना डॉ. अशोक काळे म्हणाले की,अलीकडच्या काळात विद्यार्थी मैदानापासून दुर जात आहेत अशा परिस्थिती रणवीर पंडित यांनी विद्यार्थ्यांना मैदानाकडे वळवले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शारिरीक व मानसिक आरोग्य सुधारेल. यातूनच क्रिडा क्षेत्रात जाण्यासाठी संधी निर्माण होणार आहे. रणवीर पंडित यांनी केलेली पेरणी उत्तम असून येणाऱ्या काळात क्रीडा क्षेत्रात गेवराईचे विद्यार्थी पुढे येतील असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर गाडे यांनी केले. यावेळी जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहप्रशासन अधिकारी प्रा. गोगुले, मुख्याध्यापक तथा प्राचार्य मुरलीधर पवार, अशोक तौर, भक्तराज पौळ, वसंत राठोड, रणजीत सानप, सय्यद युनुस, भागवत राऊत, विश्वनाथ पवार, अंकुश राठोड, लक्ष्मण काळे, शिवाजी पाटोळे, अरुण हाटकर, उदय पाठक, दत्तात्रय देशपांडे माजी मुख्याध्यापक राजेंद्र काळे, कैलास गायकवाड यांच्यासह शिक्षण संस्थेतील सर्व शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, क्रीडाप्रेमी नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## अजितदादा बीड...

वेळी करण्यात आला. यासाठी दवाखान्याच्या मागील गेटचा वापर करण्यात आला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी पालिका भांडार विभाग सांभाळणारे भागवत जाधव यांचे नाव सांगितले. जाधव यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी मुख्याधिकारी यांचे नाव पुढे केले. मात्र, अधिक तपासात मुख्याधिकाऱ्यांनी कोणताही लेखी आदेश दिलेला नसल्याचे स्पष्ट झाले. भंगाराबरोबर वृक्षतोड; परवानगी कुणाची? या प्रकरणात केवळ भंगार उचलच नव्हे, तर दवाखान्याच्या परिसरातील अनेक वर्षे उभ्या असलेल्या वडाच्या झाडाच्या मोठमोठ्या फांद्याही तोडण्यात आल्याचा आरोप आहे. यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली होती का, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. एकीकडे शासन वृक्षलागवडीला प्रोत्साहन देते आणि दुसरीकडे सरकारी कर्मचाऱ्यांकडूनच वृक्षतोड होत असेल, तर पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. कारवाई का होत नाही? जनतेत संशय- या प्रकरणाला आठवड्याहून अधिक काळ उलटूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नगरपालिकेचे मुख्याधिकारी कर्तव्यदक्ष व कडक प्रशासक म्हणून ओळखले जात असतानाही या प्रकरणात त्यांची भूमिका संशयास्पद वाटत असल्याची चर्चा आहे. ज्या दवाखान्याच्या परिसरातून भंगार उचलले गेले, त्या दवाखान्याचे प्रशासनही मौन बाळगत आहे. त्या वेळी असलेले सिव्हिल सर्जन बदलीवर गेले असून, नवीन सिव्हिल सर्जन यांनी या प्रकरणाचा छडा लावण्याची गरज असल्याची मागणी होत आहे. दोन्ही यंत्रणा गप्प असल्याने जनतेत वेगवेगळ्या चर्चा रंगू लागल्या आहेत. गणेश ढवळे यीं पालकमंत्री अजितदादा यांना लेखी तक्रार – या संपूर्ण प्रकरणावर सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांना लेखी तक्रार केली असुन प्रशासनाला दिलेल्या निवेदनात थेट सवाल उपस्थित केले आहेत – सरकारी माल म्हणजे कुणाच्या खासगी मालमत्तेसारखा उचलायचा का? झाडांची तोड कुणाच्या आदेशाने झाली? आणि हे सगळे घडत असताना प्रशासन गप्प का?

## ज्योतिष विशारद...

मनोहर पोतदार यांना प्रदान केला जाणार आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. मनोहर पोतदार यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच आष्टी तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे. त्यांच्या निवडीबद्दल आष्टी तालुका दिव्यांग संघटना व सर्व पदाधिकारी, आष्टी पुरोहित संघ व पदाधिकारी, भगवान महाविद्यालय परिवारासह विविध संघटनांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे: धार्मिक क्षेत्रातील या मानाच्या पुरस्कारामुळे मनोहर पोतदार यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## जे कुणाला...

यांच्या लक्षात आले होते. वडवणी शहराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेला बसस्थानकाच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकण्यात आले आहे.उपविभागीय अधिकारी श्री. गौरव इंगोले साहेब यांच्या माध्यमातून न्यायालयासमोरील सरकारी जागेवरील अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात बसस्थानकासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार नगरपंचायत वडवणी यांच्या वतीने तातडीने पत्र्याचे शेड उभारून तात्पुरत्या बसस्थानकाची व्यवस्था करण्यात आली असून त्यामुळे प्रवासी, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या सोबतच, वडवणी शहराच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब यांच्या माध्यमातून कायमस्वरूपी बसस्थानकासाठी लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, येत्या काही महिन्यांत याच ठिकाणी सुसज्ज आणि कायमस्वरूपी बसस्थानक उभारले जाईल. त्यामुळे वडवणी शहराचा बसस्थानकाचा कायमचा प्रश्न सुटणार आहे. व सतत वडवणीचे नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप व भारत दादा जगताप यांनी वडवणी करांच्या बस स्टॅन्डच स्वप्न पूर्ण केल्यामुळे जनतेत समाधान व्यक्त केले जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शेतकऱ्यांनी पीककर्ज व किसान क्रेडीट कार्डसाठी 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज करावेत: जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज, किसान क्रेडीट कार्ड तातडीने व सुलभ पध्दतीने उपलब्ध व्हावे आणि शेतकऱ्यांना बँकेत वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज प्रक्रिया जालना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. तरी शेतकऱ्यांनी जनसमर्थ पोर्टलवर नोंदणी करुन पीककर्ज व किसान क्रेडीट कार्डसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी स्वत : अथवा सेतू, महा ई सेवा, सीएससी केंद्राच्या सहाय्याने 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावा. आवश्यक माहिती, कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी



झाल्यानंतर अर्ज संबंधित बँकेकडे ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात येईल आणि बँकेकडून नियमानूसार तात्काळ कारवाई करावी. अशा सुचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हा अग्रणी बँक, सर्व राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकांचे शाखा व्यवस्थापक व नोडल अधिकारी यांना पत्राद्वारे दिल्या आहेत. प्रत्येक बँक शाखेने जनसमर्थ अर्जासाठी नोडल अधिकारी नियुक्त करुन अर्ज प्राप्त होताच तात्काळ पडताळणीची प्रक्रिया करावी. पात्र प्रकरणांना प्राधान्य देवून किमान कालावधीत शक्य असल्यास त्याच दिवशी निर्णय देण्याचा प्रत्यन करावा. प्राथमिक पडताळणीनंतरच अर्ज पुढे पाठविण्यात येत असल्याने एकाच कागदपत्रासाठी वारंवार हरकती टाळाव्यात. अर्जात त्रुटी असल्यास नेमकी त्रुटी स्पष्टपणे प्रणालीद्वारे कळवावी. जिल्ह्यातील सेतू, महा ई सेवा, सीएससी केंद्राने शेतकऱ्यांना नोंदणी, अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड, अर्जस्थिती तपासणे आदि बाबींमध्ये मदत करावी. तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांनी जिल्हा अग्रणी बँकेच्या समन्वयाने तालुकानिहाय मोहिमेचे वेळापत्रक तयार करुन प्रसिध्द करावे. जनसमर्थ पोर्टलची ग्रामपंचायत, कृषी कार्यालय, बँक शाखामार्फत व्यापक जनजागृती करण्यात यावी. अंमलबजावणीत अडचण असल्यास तात्काळ जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक व संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रत्येक आठवड्याला प्राप्त अर्ज, प्रक्रिया अर्ज, मंजूर अर्ज, प्रलंबित प्रकरणे कारणासह प्रगती अहवाल सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा. अशा सुचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत. लाभासाठी शेतकऱ्यांजवळ शेतकरी आयडी, आधार व आधार लिंक मोबाईल क्रमांक, बँक खाते तपशील, पासबुक, किसान क्रेडीट कार्ड व पीककर्ज नियमानूसार जमीन व पीक तपशिल, पॅनकार्ड तसेच बँकेने आवश्यक ठरविलेले इतर दस्तऐवज आदि कागदपत्रे असणे गरजेचे आहे.

## भाडेकरू गाळा सोडेना; तणावात आजी गेली, संतापलेल्या नातवंडांनी केलं असं, पोलिसही चक्रावले

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

भाडेकरूने मेडिकलचा गाळा रिकामा करण्यास वारंवार नकार दिल्याने सुरू असलेला वाद अखेर एका कुटुंबासाठी वेदनादायी ठरला. या तणावाच्या दरम्यानच मूळ मालक असलेल्या वृद्ध महिलेचे निधन झाले. अन्यायाने आणि संतापाने ग्रासलेल्या नातवंडांनी आजीचा मृतदेह थेट मेडिकलसमोर ठेवत आपली व्यथा व्यक्त केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मिल कॉर्नर परिसरातील इमारतीच्या मालक शकुंतला बापूराव बोरसे यांनी आपला गाळा मेडिकल चालवण्यासाठी भाड्याने दिला होता. मात्र, गाळा सोडण्यास सांगूनही भाडेकरू ऐकत नसल्याने दीर्घकाळ वाद सुरू होता. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, याच मानसिक तणावामुळे शकुंतला यांचे २४ डिसेंबर रोजी निधन झाले. निधनानंतर संतप्त कुटुंबीयांनी रुग्णवाहिकेतून मृतदेह भारत मेडिकलसमोर आणून आपला आक्रोश मांडला. काही राजकीय पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस निरीक्षक निर्मला परदेशी, सहायक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे, पोलिस अंमलदार देवीदास वाडेकर यांनी धाव घेतली. मात्र, कुटुंबीयांनी जवळपास तासभर मृतदेह हलवला नाही.

## मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत फळवृक्ष लागवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत फळवृक्ष लागवड उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संवर्धन, हरित गाव संकल्पना तसेच ग्रामविकासाला चालना देणे हा आहे. या कार्यक्रमाच्या वेळी बोरफडी गावाचे सरपंच श्री. कैलास घुगे यांच्या हस्ते फळवृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी सरपंच कैलास घुगे यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना आवाहन केले की मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत वृक्षसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

सरपंच कैलास घुगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, फळवृक्ष लागवड ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर भविष्यातील पिढीसाठीही एक महत्त्वाची गुंतवणूक आहे. गावातील प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे.

या उपक्रमामुळे गावात हरित क्षेत्र वाढीस लागणार असून पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## दत्ता वाकसे व विनोद असलकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रम व अनाथ मुलांना ब्लँकेट वाटप

### सामाजिक दायित्व जपत दिली मायेची ऊब ; वृद्ध व अनाथांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले

**वडवणी । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते तथा मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे आणि वडवणी येथील माऊली सिलेक्शनचे मालक तथा युवा उद्योजक विनोद असलकर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत अनोखा उपक्रम राबविण्यात आला. चाकरवाडी जवळील कळसंबर येथील 'आपला परिवार' वृद्धाश्रम तसेच बीड जिल्ह्यातील पालीजवळ असलेल्या इंनफंट इंडिया ट्रस्टचे 'आनंदग्राम' या एचआयव्हीग्रस्त अनाथ मुलांच्या संस्थेत ब्लँकेट वाटप करून गरजूंसाठी मायेची ऊब दिली.





वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा न करता, बॅनर-फटाके टाळून समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करण्याचा निर्णय दत्ता वाकसे व विनोद असलकर यांनी घेतला. वाढदिवसाच्या निमित्ताने समाजाला सकारात्मक संदेश मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कळसंबर येथे सामाजिक कार्यकर्त्या मनीषा पवार यांनी सुरू केलेल्या आपला परिवार वृद्धाश्रमात गोरगरीब वयोवृद्धांची सेवा केली जाते. तसेच बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून दत्ता बारगजे व संध्या बारगजे या दाम्पत्याने इंनफंट इंडिया ट्रस्टचे आनंदग्राम या संस्थेमार्फत एचआयव्हीग्रस्त अनाथ मुलांचे संगोपन व शिक्षणाची जबाबदारी उचलली आहे. या दोन्ही ठिकाणी ब्लँकेट वाटप करून वृद्ध व अनाथ बालकांना आधार देण्यात आला. या उपक्रमामुळे वृद्ध व अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले.याप्रसंगी आपला परिवार अनाथ वृध्दाश्रमचे सुनिल पवार यांनी दत्ता वाकसे यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या तर शोभा पवार यांनी औक्षण केले. आनंदग्राम येथे दत्ता वाकसे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार केला. दत्ता बारगजे यांचे सासरे व संध्या बारगजे यांचे वडील स्व.गणपत यशवंत चाटे यांचे निधन झाले तरी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

## मोरेश्वर संस्थान कोळवाडी येथे गुरुवर्य गंगाभारती महाराजांचा 33 वा पुण्यतिथी सोहळा उत्साहात साजरा होणार

**कोळवाडी प्रतिनिधी**

मोरेश्वर संस्थान, कोळवाडी येथे प. पू. १००८ गुरुवर्य गंगाभारतीजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा दि. १५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे. पुण्यतिथी सोहळ्याचा प्रारंभ पौष वद्य १२ शके १९४७, गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून ह.भ.प. हरिहर भारती महाराज यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येणार आहे. या सोहळ्याची सांगता पौष वद्य १४, शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ रोजी होईल.तीन दिवस चालणाऱ्या या पुण्यतिथी सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ आरती तसेच सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ असे दैनंदिन कार्यक्रम



आयोजित करण्यात आले आहेत. शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता श्रींची महापूजा व त्यानंतर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.

या पुण्यतिथी सोहळ्यात नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा लाभणार आहे. गुरुवार दि. १५ जानेवारी रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. भागवताचार्य विनायक महाराज सातव (बुलढाणा) यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. नवनाथ महाराज गोगावले (शिंदेवाडीकर), पुणे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तसेच शनिवार दि. १७ जानेवारी रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन ह.भ.प. पुंडलिक महाराज जाधव (पंढरपूर), शिक्षक - जोग महाराज वारकरी शैक्षणिक संस्था यांच्या सेवेतून संपन्न होणार आहे.

या पुण्यतिथी सोहळ्यास प. पू. गुरुवर्य गंगाभारतीजी महाराजांचे शिष्यमंडळ, मोरेश्वर संस्थान भक्त मंडळ तसेच पंचक्रोशीतील असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सोहळ्यानिमित्त शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मोरेश्वर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

या पुण्यतिथी सोहळ्यास प्रेरणास्थान म्हणून श्री. हरिहर भारती महाराज, मठाधीपती, मोरेश्वर संस्थान, कोळवाडी यांचे मार्गदर्शन लाभत असून हा संपूर्ण कार्यक्रम श्री क्षेत्र तपोवन, मोरेश्वर संस्थान, कोळवाडी (ता. जि. बीड) येथे होणार आहे.

## ह भ प विजय सर राजपुरे यांना एका महिन्यात दोन राज्यस्तरीय पुरस्कार



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील धनगरवाडी (डो) येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेले ह.भ.प. विजय राजपुरे यांना लहानपणापासूनच अध्यात्मिक क्षेत्राची आवड होती. लहानपणापासून संघर्षमय जीवन जगणारे शेतीतील कामे, ऊस तोडणे, ट्रॅक्टर चालवणे असे सर्व कामे विजय राजपुरे यांनी केलेले आहेत. अभ्यासाची आवड असल्याने त्यांनी रांजणगाव येथे महागणपती फाउंडेशन रांजणगाव येथे स्पर्धा परीक्षाची तयारी सुरू केली पण त्यांच्याकडे सेवाभावी वृत्ती असल्याने त्यांनी आष्टी येथे ग्रामीण भागातील तरुणांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कोचिंग क्लास सुरू केले गरीबीची जाणीव असल्याने अनाथ अपंग मुलांसाठी मोफत क्लास सुरू केले आणि कोरोना आल्यानंतर ऑफलाईन क्लास बंद झाले तर त्यांनी श्रीक्षेत्र सुदर्शन आश्रम शिंदेवाडी येथील महंत सुदर्शन मुनी महाराज उदासीन यांच्या मार्गदर्शनाने किर्तन प्रवचन सुरू केले आणि प्रा विजय सर राजपुरे हे ह भ प विजय महाराज राजपुरे या नावाने प्रसिद्ध झाले. या महिन्यात महिन्यात लोकशक्ती समाजभूषण व गंगाई बाबाजी हे दोन राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत ता.वडवणी जि.बीड येथे कृषी तज्ञ स्वर्गीय डॉ. पंजाबराव शामराव देशमुख यांच्या जयंती निमित्त शेतकरी अभियान राबवले.यावेळी शेतकऱ्यांना विविध उद्योग बद्दल माहिती व विविध योजने बद्दल माहिती दिली. आणि संस्थेचे अध्यक्ष यांनी आधुनिक शेती बद्दल मार्गदर्शन केले.यावेळी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष छाया पवार, सचिव तेजस पवार, रोहन डोळस, तेजस्विनी पवार, सदस्य तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते*

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी जागरूक होणे गरजेचे: राहुल गिरी

### अभिनव पब्लिक स्कूलचा परिसंवाद मेळावा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

शिक्षणाच्या प्रवाहात वावराताना माय,माती आणि माणुसकी ची जाणीव मुलांना होण्यासाठी पालकांनी जागरूक होणे गरजेचे आहे.बालमनावर सुसंस्कार होण्यासाठी शिक्षकांसोबतच पालकाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते राहुल गिरी यांनी केले. येथील अभिनव पब्लिक स्कूलच्या शिक्षक-



पालक परिसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. पुढे बोलताना ज्याप्रमाणे राजमाता जिजाऊंनी छ.शिवाजी महाराजांवर संस्कार केले त्याच प्रमाणे मातापालकांची आपल्या मुलांबाबत योग्य ती भुमिका निभावली पाहिजे असे गिरी यांनी माता पालकांना मार्गदर्शनात आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून, पालकांना आपल्या पाल्याच्या संगोपनासाठी मार्गदर्शन मिळावे, शिक्षण क्षेत्रामध्ये नवनवीन होत असलेल्या बदलांची माहिती व्हावी, एक पालक म्हणून कोणती कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे यासाठी परिसंवाद मेळाव्याचे आयोजन शनिवारी अभिनव स्कूल ने केले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फ्लाइंग बर्ड अकॅडमीचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, नवनियुक्त राजपत्रित अधिकारी श्रीकांत होरमाळे,प्रा.डॉ.रमेश गटकळ यांची प्रमुख उपस्थिती होती.पाल्यांचे शिक्षण घेताना भौतीक ज्ञान विकसित होणे, डिजिटल युगात केवळ चांगल्या गोष्टी आत्मसात करणे, मोबाईलचा अतिरेक न होणे यासाठी पालकांना मार्गदर्शन याप्रसंगी मान्यवरांनी केले.शाळेचे अध्यक्ष अभिमान पारेकर, गणेश गटकळ, गणेश लाटे यांच्या सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या प्रसंगी श्रमदान केले.प्रा.डॉ.रमेश गटकळ यांच्या सुश्राव्य वाणीत पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## दिंद्रुड येथील जि. प. शाळांची शैक्षणिक सहल यशस्वी

### धारूर भुईकोट किल्ला, साखर कारखाना व माता वैष्णवी देवी मंदिरास विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक कन्या शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा, दिंद्रुड यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल (क्षेत्रभेट) आयोजित करण्यात आली होती. या सहलीअंतर्गत विद्यार्थ्यांना धारूर येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ला, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना तसेच तेलगाव येथील माता वैष्णवी देवी मंदिर येथे नेण्यात



आले. धारूर भुईकोट किल्ल्यावर विद्यार्थ्यांना किल्ला का आणि कशासाठी बांधण्यात आला, त्याचे ऐतिहासिक महत्त्व, संरक्षणात्मक रचना याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली. लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात विद्यार्थ्यांनी ऊसापासून साखर निर्मितीची प्रक्रिया तसेच इथेनॉल निर्मिती कशी केली जाते याची प्रत्यक्ष पाहणी केली.

## अग्नि भडकला तर तो नियंत्रणात आणणे हे अशक्यप्राय ठरते: साध्वी प्रतिभाजी म.सा. यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**



अग्नि भडकला तर तो नियंत्रणात आणणे हे अशक्यप्राय ठरते असे प्रतिपादन साध्वी प्रतिभाजी म.सा यांनी केले. त्या बीड येथील तेरापंथ स्वाध्याय भवन गुजराती कॉलनी येथील प्रवचनमाले दरम्यान केले. त्या पारगाव तालुका वाशी येथील नवनिर्मित जैन स्थानकाच्या उद्धाटन व लोकार्पण कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी कोठा संप्रदाय प्रमुख महाराष्ट्र प्रवर्तनी पूज्य श्री प्रतिभा कवरजी महाराज या आपल्या चार साध्वी वृंदासह जात असताना, जैन धर्मियांचे मोठे क्षेत्र असणार्या बीडकरांच्या विनंतीला मान देवून दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी बीड त्यांचे येथे आगमन झाले. यावेळी समाज बांधवांच्यावतीने त्यांचे बीड नगरीत उत्साहात स्वागत केले. यावेळी प्रवचनमालेत बोलतांना साध्वी प्रतिभाजी म.सा. म्हणाल्या की, हिंदू व जैन संस्कृतीमध्ये नववर्ष हे चैत्र शुद्ध प्रतिपदा हे शालीवाहन शके तर कार्तिक शुद्ध प्रतिपदा हे विक्रम संवत म्हणून मराठी दिनदर्शिकावरून सुरू होतात. मात्र पश्चिमात्य संस्कृतीच्या अधीन आपण गेल्यामुळे या वर्षाअखेर आपण अमंगलरित्या आनंद साजरा करतो. त्यानुसारच आपल्यावर पडलेल्या त्यांच्या प्रभावाने आपण याच दिवसाला वर्ष समजून त्यांचे रितीरिवाज पाळतो. या दृष्टिकोनातून नवीन लागणारे वर्ष हे आपणास सौख्य, संपन्नता, वैभवात जावो यासाठी मंगल कामना करतो.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ ● पान ४

## बीड शहरात रॉबरी व मोबाईल चोरी करणारा आरोपी पकडला




**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बस स्टॅन्ड व सिव्हिल हॉस्पिटल परिसरात सातत्याने मोबाईल चोरी, जबरी चोरी, नागरिकांना अडवून बळजबरी पैसे काढून घेणे, खिशातून पैसे लंपास करणे, मारहाण तसेच खून प्रयत्नासारख्या गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपीस बीड शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने शिताफीने अटक करून त्याच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव दीपक संतोष भोरे, रा. खडकपुरा पेठ, बीड,असे आहे.या आरोपीवर यापूर्वीही खून, मारामारी, जबरी चोरी व चोरी अशा विविध प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.आरोपी हा विशेषतः मोबाईल चोरी करण्याच्या सवयीचा सराईत गुन्हेगार असून तो बस स्टॅन्ड व सिव्हिल हॉस्पिटलसारख्या गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची गर्दी पाहून गुन्हे करत असल्याचे उघड झाले आहे.गुन्हे करून हा आरोपी नाशिक येथे पळून जाऊन तेथे वास्तव्य करत होता. गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे बीड शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने त्याचा माग काढून अटक केली आहे.या कारवाईमुळे बस स्टॅन्ड व सिव्हिल हॉस्पिटल परिसरात होणाऱ्या चोरी व जबरी चोरीच्या गुन्ह्यांना आळा बसणार असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होणार आहे.वारंवार गुन्हे करणाऱ्या अशा सराईत आरोपींवर तडीपारीसारखी कडक कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'जय भवानी'ला सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेचा तृतीय पुरस्कार जाहिर

### वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या वार्षिक सभेत होणार सन्मान ;तांत्रिक उत्कृष्टतेचा जय भवानीवर शिक्कामोर्तब

**गेवराई । प्रतिनिधी**



वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे या सहकार आणि साखर उद्योगातील मातृ संस्थेकडून राज्यातील साखर कारखान्यांचे तांत्रिक कार्यक्षमतेचे मुल्यमापन करून सर्वोत्कृष्ट कार्यक्षमते बाबतचे पुरस्कार दिले जातात. सन २०२४-२५ च्या हंगामाकरीता जय भवानी सहकारी साखर कारखान्याला सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमते बाबतचा तृतीय पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. जय भवानी पन्नासाव्या वर्षात पदार्पण करत असताना त्यांना मिळालेला हा पुरस्कार जय भवानीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारा ठरत असून तांत्रिकदृष्ट्या जय भवानीने स्वतःला सिध्द केले असून हा पुरस्कार कारखान्याचे कामगार, कर्मचारी, इंजिनिअर्स, अधिकारी, संचालक मंडळ, सभासद यांना समर्पित असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले आहे. सोमवार, दि.२९ डिसेंबर रोजी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे. यामुळे सर्व स्तरातून जय भवानीचे कौतुक होत आहे. गेवराई तालुक्याची अर्थवाहिनी म्हणून ओळख असलेल्या जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेला यावर्षी पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे या सहकार आणि साखर उद्योगातील मातृ संस्थेकडून दिला जाणारा सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमते बाबतचा तृतीय पुरस्कार जय भवानीला जाहिर झाला आहे. कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वात जय भवानीने तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्टतेवर ▶▶ उर्वरित पान २ वर

## महावितरण कडुन सर्व सामान्यांना मानसिक त्रास रेगुलर बील भरणारांना जास्तीचे बील देण्याचा सपाटा




● अनेक घरगुती विज ग्राहकांचे टिडी पीडीच्या नावाखाली मिटर काढुन नेत कनेक्शन तोडले

● ईमानदारीने बील भरणारांना आकड्याचा टिटकारा विज उपलब्ध होत नसल्याने आणेकांनी घरजागा विकून गाव सोडले

● मिटर पीडी केल्याची बतावनी करुन कनेक्शन तोडत मिटर जमा केले तरीही बील सुरुच

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील महावितरणच्या आडमुठ्या धोरणामुळे आणेक विज ग्राहकांना मानसिक त्रासला सामोरे जावे लागत असून कर्ज बाजारी शेतकरी ज्या प्रमाणे विविध बँकांच्या त्रासाला कंटाळुन आत्महत्या करु लागल्याचे विदारक चित्र सातत्याने बीड जिल्ह्यासह राज्यभरात पाहावयास मिळत आसतांना आता महावितरण नियमित विज बील भरणा करणा-यांना सातत्याने जास्तीचे बील देत आसल्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात समोर येत असुन ▶▶ उर्वरित पान २ वर

## नाथ फाउंडेशन उपक्रमांमुळे ब्रम्हगाव जि.प. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते : विलास घोरड

### परिसरातील जि.प. शाळा इंग्रजी माध्यमांपेक्षा चांगल्या बनवू : धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**



ब्रम्हगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्व विद्यार्थ्यांना नाथ फाउंडेशन वतीने मोफत मॅजिक परीक्षा पॅड वाटप हे संचालक धनंजय गुंदेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी या उपक्रमासाठी पुढाकार घेणारे विलास घोरड यांनी नाथ फाउंडेशन उपक्रमांचे कौतुक करत आधी दप्तर वाटप आता पॅड वाटप अशा उपक्रमांमुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षणात व अभ्यासात प्रोत्साहन मिळत असल्याचे ते म्हंटले.

जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी व गणित सुधारण्यासाठी हा मॅजिक परीक्षा पॅड उपयोगी ठरणार आहे.. विद्यार्थ्यांनी या मॅजिक परीक्षा ▶▶ उर्वरित पान २ वर

## पदे १५ हजार अर्ज १६ लाख

### राज्यात पोलिस दलातील भरतीसाठी प्रचंड स्पर्धा

**वडवणी । प्रतिनिधी**

पोलिस दलामध्ये भरती होण्यासाठीची स्पर्धा वाढली असल्याचे या वर्षीच्या आकडेवारीतून दिसून येते. मुंबईसह राज्यात पोलिस दलातील वेगवेगळ्या १५ हजार ४०५ पदांसाठी तब्बल १६ लाख ५२ हजार ८५० उमेदवारांनी अर्ज केला आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

**गैरप्रकार रोखण्याचे आव्हान**

**शिपाई, चालकांसह इतर पदावर घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेत इअर बर्ड आणि इलेक्ट्रिक डिव्हाइसच्या माध्यमातून हायटेक कॉपी आणि बनावट हॉल तिकिटाच्या माध्यमातून प्रवेश मिळविण्याचे प्रकार याआधी घडलेले आहेत. मैदानी चाचणीत पायातील चिपची अदलाबदल करून उत्तीर्ण होण्याचे प्रकार घडले होते. वर्गामध्ये; तसेच मैदानावर घडणाऱ्या या गैरप्रकारांना रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे आहे.**

## जलतरण स्पर्धेतही गेवराईचे विद्यार्थी खेळाडूं झळकतील: रणवीर पंडित



### जलतरण स्पर्धेने क्रीडा महोत्सवाचा शानदार शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंना क्रिडा क्षेत्रात करिअर करता यावे म्हणून जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे गेल्या तीन वर्षापासून आयोजन करण्यात येत आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून तालुक्याच्या ग्रामीण भागातील खेळाडू राज्य व राष्ट्रीय पातळीवर गेले असून या वर्षी जलतरण स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. जलतरण स्पर्धेतही एक दिवस गेवराई तालुक्यातील खेळाडू देश पातळीवर खेळेल आणि या तालुक्याचा नाव लौकिक होईल असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अकादमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवातील जलतरण स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी जलतरण स्पर्धेत विजेत्या जलतरण स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित ▶▶ उर्वरित पान २ वर

## तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठ्याचे आशीर्वादाने माजलगाव तालुक्यात गंगामसला शुक्लयतीर्थ लिमगाव मोगरा अवैध वाळूचे तस्करी जोरात

### जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब वेळीच लक्ष घाला

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात अवैध वाळू उपशाचे प्रमाण वाढले आहे गंगामसला शुक्लतीर्थ लिमगाव मोगरा आधी गावाच्या गंगा पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध उपसा केला जात आहे याबाबत संबंधित गावकऱ्यांनी अनेक वेळा तहसीलदार तलाठी मंडळ अधिकारी यांना तक्रारी केल्या मात्र तहसीलदार मंडळाधिकारी तलाठी यांनी या गावकऱ्याच्या तक्रारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे मला घे वाळू माफिया या तीन अधिकाऱ्यांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात वाळूचा करत आहे तो हैदोस माजवत आहेत त्यामुळे मस्तावलेले वाळू माफिया गावकऱ्यांना ही भीत नाहीत उलट जिवंत मारण्याचे धमक्या देत आहेत त्यामुळे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेबांनी माजलगाव तालुक्यातील वेळीच लक्ष घालून होणारी अवैध वाळू उपसा अवैध वाळू वाहतूक थांबवावी व पुढील होणारे अनर्थ टाळावेत अशी मागणी गंगामसला शुक्लतीर्थ लिमगाव मोगरा लिमगाव आधी ठिकाणच्या गावकऱ्यासह पंचक्रोशीतून व्यक्त केली जात आहे त्यामुळे माजलगाव तालुक्यातील जनतेच्या मागणीचा आदर राखून जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब माजलगाव तालुक्यात होणारी अवैध वाळू वाहतूक थांबवतील अशी अशा व्यक्त केली जात आहे

# अजितदादा बीड नगरपालिका भंगार चोर आणि वृक्षतोड्या निघाली

### सरकारी दवाखान्यातील भंगार उचल व वृक्षतोड प्रकरण तापले ; पालकमंत्री अजितदादांना तक्रार : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेतील कथित भ्रष्टाचाराची 'भागवत कथा' आता उघडकीस येण्याच्या मार्गावर असून, या प्रकरणामुळे नगरपालिका व आरोग्य विभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारी दवाखान्यातील भंगार अवैधरीत्या उचलण्यात आल्याचा तसेच परिसरातील झाडांच्या मोठ्या फांद्यांची बेकायदेशीर तोड करण्यात आल्याचा गंभीर आरोप



समोर आला आहे.

या प्रकरणात नगरपालिकेचे अधिकारी आणि आरोग्य विभाग एकमेकांकडे बोट दाखवत असून, नगरपालिका मुख्याधिकारी आणि सिव्हिल सर्जन दोघेही 'तोंडावर बोट' ठेवून गप्प बसल्याची स्थिती असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. नेमकी परवानगी कोणी दिली? भंगार कुठे नेण्यात आले? त्याची नोंद कुठे आहे? या मूलभूत प्रश्नांची उत्तरे देण्यास प्रशासन टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे.

**रात्रीच्या अंधारात भंगार उचल; तीन दिवसांचा प्रकार**

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी बीड नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी सरकारी दवाखान्याच्या मागील बाजूचे लोखंडी शेड उघडून भंगार टेम्पोमध्ये भरून नेले. विशेष म्हणजे हा प्रकार सलग तीन दिवस रात्रीच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## ज्योतिष विशारद मनोहर पोतदार (देवा) यांना 'गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार' जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी येथील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान महाविद्यालयाच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार' यंदा आष्टी येथील विठ्ठल मंदिराचे पुजारी आणि प्रसिद्ध ज्योतिष विशारद मनोहर पोतदार (देवा) यांना जाहीर करण्यात आला आहे. धार्मिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

गंगाई-बाबाजी महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रांत समाजासाठी बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले जाते. मनोहर पोतदार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आष्टी येथील विठ्ठल मंदिरात पुजारी म्हणून सेवा बजावतानाच धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात मोठे कार्य केले आहे. त्यांच्या याच कार्याचा गौरव म्हणून २०२५ चा धार्मिक क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार त्यांना घोषित झाला आहे.

हा गौरव सोहळा गुरुवारी, दि. १ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या शुभहस्ते आणि इतर मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत हा पुरस्कार ▶▶ उर्वरित पान २ वर

# जे कुणाला जमलं नाही ते जगताप बंधूनी दादाच्या माध्यमातून केलं

**२० ते ३० वर्षापासूनचा बस स्टँड चा वनवास मिटला**



**वडवणी । प्रतिनिधी**

आमदार प्रकाश सोळंके यांनी वडवणीत लक्ष घातल्यापासून या भागाचे रुपडे पालटले आहे. रस्ते व विविध विकासकामांसाठे कोट्यवधी रुपयाचा निधी मिळत असून अनेक ठिकाणच्या बंद पडलेल्या पाणीयोजना सुरू करण्यात आल्या आहेत. माजलगाव मतदारसंघात दळणवळणाच्या सोयी केल्या जात असून मोठा उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न



केले जात आहेत. पायाभूत सोयी सुविधा देताना नागरिकांना प्रवास सुखकर वहावा यासाठी वडवणी बसस्थानकाची आवश्यकता असल्याचे आमदार प्रकाश सोळंके ▶▶ उर्वरित पान २ वर

**● लवकरच निधी उपलब्ध करू- शेषेराव जगताप**

**आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब यांच्या माध्यमातून कायमस्वरूपी बसस्थानकासाठी लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, येत्या काही महिन्यांत याच ठिकाणी सुसज्ज आणि कायमस्वरूपी बसस्थानक उभारले जाईल. त्यामुळे वडवणी शहराचा बसस्थानकाचा कायमचा प्रश्न सुटणार आहे.**

**● ऊन,वारा, पावसाचा प्रश्न मिटला**

**तालुक्यातील प्रवाशांना रस्त्यावर उन, वारा, पावसाचा सामना करीत प्रवास करावा लागत होता. शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध महिला पुरुष आणि रुग्णांना देखील उन्हात, पावसात भिजत रस्त्यावर थांबत बसावे लागत होते. शहरात बस स्थानकासाठी योग्य जागा नसल्यामुळे हा प्रश्न रखडत राहिला होता.**